९२९

असा. क्र. १५

रजिस्टर्ड नं. एमएच/बाय-साऊथ/२०

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

बुधवार, जानेवारी १५, १९९७/पौष २५, शके १९१८

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि महाराष्ट्र विधानसभेत व महाराष्ट्र विधानपरिषदेत सादर केलेली विधेयके.**

अनुक्रमणिका

| | |
|---|---|
| | पृष्ठे |
| सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४.—महाराष्ट्र राज्यातील महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुका घेण्यासाठी तात्पुरती तरतूद करण्याकरिता अधिनियम. .. .. .. .. | १३१–१४१ |

दिनांक १२ जानेवारी १९९७ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला, महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**प्रतिमा उमरजी,**
सचिव, महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

### सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४.

[राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "महाराष्ट्र शासन राजपत्रात" दिनांक १५ जानेवारी १९९७ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.]

**महाराष्ट्र राज्यातील महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुका घेण्यासाठी तात्पुरती तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र राज्यातील सध्याच्या महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुका फेब्रुवारी १९९७ च्या मध्यास केव्हातरी घेण्यात येणार आहेत;

**आणि ज्याअर्थी,** निवडणूक प्रक्रियेशी संबंधित सर्व तिन्ही महानगरपालिका कायद्यांमध्ये भिन्न भिन्न तरतुदी होत्या;

**आणि ज्याअर्थी,** निवडणुका घेताना सर्व महानगरपालिकांच्या निवडणूक प्रक्रियेमध्ये एकरूपता आणणे आवश्यक आहे असे महाराष्ट्र शासनाला वाटले ;

आणि ज्याअर्थी, निवडणूक प्रक्रियेमध्ये अशी एकरूपता आणण्यासाठी आणि लोकसभेच्या निवडणुकीसाठी अनुसरलेल्या निवडणूक प्रक्रियेशी ती शक्यतो अनुरूप करण्यासाठी याबाबत तात्पुरता कायदा करून विशेष तरतुदी करणे इष्ट आहे असे राज्य शासनाला वाटते;

आणि ज्याअर्थी, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते;

आणि ज्याअर्थी, राज्यातील सध्याच्या महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणुका घेण्यासाठी, तात्पुरत्या कायद्याने, विशेष तरतुदी करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्राच्या राज्यपालांची खात्री झाली होती; आणि म्हणून, त्यांनी दिनांक २७ नोव्हेंबर १९९६ रोजी महाराष्ट्र महानगरपालिका (तात्पुरत्या तरतुदी) अध्यादेश, १९९६ प्रख्यापित केला होता; (१९९६ चा महा. अध्या. ३१.)

आणि ज्याअर्थी, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या सत्तेचाळिसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव, प्रारंभ व कालावधी.

१. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र महानगरपालिका (तात्पुरत्या तरतुदी) अधिनियम, १९९६ असे म्हणावे.

(२) तो दिनांक २७ नोव्हेंबर १९९६ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

(३) तो, फेब्रुवारी १९९७ या महिन्यात घेण्यात यावयाच्या नऊ महानगरपालिकांच्या निवडणुकांचे सर्व निकाल राजपत्रात प्रसिद्ध होईतोपर्यंत अंमलात राहील आणि मुंबई सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १९०४ याचे कलम ७ हे, या अधिनियमाच्या समाप्तीनंतर, जणू काही तो अधिनियम महाराष्ट्र अधिनियमाद्वारे निरसित झाल्याप्रमाणे लागू होईल. (१९०४ चा मुंबई १.)

निवडणुकीच्या ~~संबंधी~~ निवडणूक-विषयक आणि इतर आनुषंगिक तरतुदी.

२. संबंधित महानगरपालिका कायद्यान्वये किंवा त्यात अंतर्भूत असलेल्या किंवा त्याखाली करण्यात आलेल्या निवडणूक नियमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, नगरपालिकांची पुनर्रचना करण्याच्या प्रयोजनार्थ विद्यमान नगरपालिकांचा कालावधी समाप्त होण्यापूर्वी सार्वत्रिक निवडणुका घेण्याकरिता पुढील तरतुदी लागू होतील :—

(१) (अ) प्रभागाच्या सीमा निश्चित करण्याची आणि प्रभागाच्या मतदार याद्या तयार करण्याची प्रक्रिया चाळीस दिवसांपेक्षा जास्त नाही इतक्या दिवसांच्या आत पूर्ण करण्यात येईल.

(ब) निवडणूक घेण्याच्या तारखा निश्चित करताना राज्य निवडणूक आयुक्त, निवडणुकीच्या संबंधातील अधीक्षण, निदेशन आणि नियंत्रण करण्याच्या त्याच्या सर्वसाधारण अधिकारांना बाधा न येऊ देता पुढील तारखा निश्चित करील :—

(एक) महापालिका आयुक्ताने निवडणूक कार्यक्रमाची नोटीस प्रसिद्ध करण्याची तारीख ही, तारीख प्रभागाच्या मतदार याद्यांच्या अधिप्रमाणनानंतरचा दुसरा दिवस असेल.

(दोन) नामनिर्देशन करण्याची शेवटची तारीख ही तारीख निवडणूक कार्यक्रमाची नोटीस प्रसिद्ध करण्याच्या तारखेपासून सातवा दिवस (दोन्ही दिवस धरून) असेल, पहिल्या सहा दिवसांमध्ये सकाळी ११–०० ते दुपारी ३–०० या वेळेच्या दरम्यान नामनिर्देशनपत्राचे नमुने देण्यात आणि स्वीकारण्यात येतील आणि शेवटच्या दिवशी सकाळी ११–०० ते दुपारी २–०० च्या दरम्यान देण्यात येतील व दुपारी ३–०० च्या पूर्वी स्वीकारण्यात येतील.

(तीन) उमेदवाराने आपले नाव मागे घेण्याची शेवटची तारीख ही तारीख छाननीच्या तारखेनंतरचा दुसरा दिवस असेल (सकाळी ११–०० ते दुपारी ३–००).

(चार) निवडणूक चिन्हाचे नियत वाटप करण्याची तारीख ही तारीख नाव मागे घेण्याच्या अखेरच्या तारखेनंतरचा दिवस असेल.

(पाच) निवडणूक लढणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्याची तारीख ही तारीख निवडणूक चिन्हांच्या नियत वाटपाच्या तारखेनंतरचा दुसरा दिवस असेल.

(सहा) आवश्यक असल्यास ज्या तारखेस आणि ज्या वेळी निवडणूक घेण्यात येईल ती तारीख आणि ती वेळ निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांची यादी प्रसिद्ध करण्यात आल्याच्या तारखेपासून पंधरावा दिवस आणि सकाळी ८-०० ते दुपारी ५-०० या दरम्यानची असेल.

(सात) मतमोजणीची तारीख, वेळ आणि जागा ही तारीख मतदानाच्या तारखेनंतरचा दिवस असेल.

(आठ) **महाराष्ट्र शासन राजपत्रात** निकाल प्रसिद्ध करण्याची तारीख ही तारीख निकालाच्या तारखेनंतरचा दुसरा दिवस असेल.

(क) नैसर्गिक आपत्ती आणि कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती यांसारख्या विशेष परिस्थितीत कारणे लेखी नमूद केल्यानंतर राज्य निवडणूक आयुक्ताने प्रसंगानुरूप या तारखा बदलणे हे कायद्याला धरून असेल.

(२) उमेदवारांच्या नामनिर्देशनाकरिता नेमून दिलेल्या दिनांकाला किंवा त्यापूर्वी प्रत्येक उमेदवाराने भरावयाची अनामत रक्कम एक हजार रुपये असेल :

परंतु, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा यथास्थिति, नागरिकांचा मागासवर्ग या वर्गातील उमेदवाराने भरावयाची अनामत रक्कम दोनशे पन्नास रुपये असेल.

(३) संपूर्ण नगरपालिका प्रभागातील मतपत्रिका एकत्र मिसळून मतमोजणी करण्यात येईल.

(४) राज्य निवडणूक आयोगाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाच्या अधीन राहून, नामनिर्देशनपत्र अनुसूची - एक मधील नमुन्याप्रमाणे असेल.

(५) राज्य निवडणूक आयोगाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाच्या अधीन राहून, मतपत्रिका ही अनुसूची - दोन मधील नमुन्याप्रमाणे असेल.

३. महानगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीमध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग यांमधील व्यक्ती आणि महिला यांच्यासाठी राखून ठेवलेल्या जागा पुढील पद्धतीने ठरवण्यात येतील व आळीपाळीची पद्धत धरून खालील पद्धतीने नेमून देण्यात येतील :— अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि नागरिकांचा मागासवर्ग आणि महिला यांच्यासाठी राखून ठेवलेल्या जागा नेमून देण्याची व आळीपाळीने नेमून देण्याची पद्धती.

१८८८ चा मुंबई ३. (१) (अ) महानगरपालिकेमध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती यांच्यासाठी राखून ठेवावयाच्या जागा, मुंबई महानगरपालिका अधिनियमाचे कलम ५-अ, पोट-कलमे (२) व (३) यांच्या किंवा यथास्थिति, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ याचे कलम ९-अ, पोट-कलम (२) च्या तरतुदींना अधीन राहून, ज्या प्रभागामधील एकूण लोकसंख्येच्या संदर्भात अशा जातींच्या किंवा यथास्थिति, जमातींच्या लोकसंख्येची टक्केवारी सर्वांत अधिक असेल अशा प्रभागापासून सुरुवात करून उतरत्या क्रमाने नेमून देण्यात येतील. १९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड २.

(ब) उप-खंड (अ) मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, जेथे अगोदरच्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये अशा जातींसाठी किंवा यथास्थिति जमातींसाठी कोणत्याही जागा राखून ठेवलेल्या नसतील अशा प्रभागांना, अशा राखून ठेवावयाच्या जागांचे परिभ्रमण, नंतरच्या निवडणुकांमध्ये महानगरपालिका क्षेत्रातील प्रत्येक प्रभागाला असे आरक्षण आळीपाळीने दिले जाईपर्यंत, करण्यात येईल.

**स्पष्टीकरण.**—जागांच्या संख्येची गणना करताना एका जागेचा एकद्वितीयांश किंवा त्यापेक्षा अधिक भाग एक भाग म्हणून मोजण्यात येईल आणि एकद्वितीयांशापेक्षा कमी भाग विचारात घेण्यात येणार नाही.

(२) (अ) नागरिकांचा मागासवर्ग या प्रवर्गासाठी राखून ठेवावयाच्या जागा मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५-अ चे पोट-कलम (४) किंवा यथास्थिति, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ याच्या कलम ९-अ चे पोट-कलम (३) यांच्या तरतुदींना अधीन राहून, चिठ्ठ्या काढून प्रभागांना नेमून देण्यात येतील : १८८८ चा मुंबई ३. १९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड २.

परंतु, चिठ्ठ्या काढताना, अनुसूचित जातींसाठी व अनुसूचित जमातींसाठी अगोदरच राखून ठेवलेल्या जागा वगळण्यात येतील.

(ब) उप-खंड (अ) मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, जेथे अगोदरच्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये नागरिकांचा मागासवर्ग या प्रवर्गासाठी कोणत्याही जागा राखून ठेवलेल्या नसतील अशा प्रभागांना, अशा राखून ठेवावयाच्या जागांचे परिभ्रमण नंतरच्या निवडणुकीमध्ये महानगरपालिका क्षेत्रातील प्रत्येक प्रभागाला असे आरक्षण आळीपाळीने दिले जाईपर्यंत करण्यात येईल.

**स्पष्टीकरण.**—जागांच्या संख्येची गणना करताना, जागेचा अर्धा भागांश किंवा त्यापेक्षा अधिक भागांश हा एक पूर्ण जागा म्हणून मोजण्यात येईल आणि अर्ध्या भागांशापेक्षा कमी भाग हिशेबात घेण्यात येणार नाही.

(३) मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५-अ च्या पोट-कलम (२), पोट-कलम (३), पोट-कलम (४) व पोट-कलम (५) यांच्या तरतुदींच्या किंवा यथास्थिति, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ याच्या कलम ९ अ च्या पोट-कलम (२) च्या परंतुकाच्या व पोट-कलम (३), पोट-कलम (४) आणि पोट-कलम (५) च्या परंतुकाच्या अधीन राहून स्त्रियांसाठी राखीव ठेवण्यात येणाऱ्या जागा पुढील तत्त्वांनुसार नेमून देण्यात येतील आणि आळीपाळीने देण्यात येतील :— १८८८ चा मुंबई ३. १९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड २.

(अ) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा यथास्थिति, नागरिकांचा मागासवर्ग यांच्यासाठी चिठ्ठी टाकून राखीव जागांमधील जागा राखून ठेवण्यात येत असतील अशा बाबतीत या अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा यथास्थिति, नागरिकांचा मागासवर्ग यांमधील स्त्रियांसाठी राखून ठेवण्यात येणाऱ्या जागा वेगवेगळ्या प्रभागांना नेमून देण्यात येतील.

(ब) उप-खंड (अ) मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी नंतरच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या वेळी शहरातील वेगवेगळ्या प्रभागांमध्ये अशा जागा आळीपाळीने नेमून देताना, अशा जाती, जमाती, किंवा यथास्थिति, मागासवर्ग, यांमधील स्त्रियांसाठी आधीच्या निवडणुकांमध्ये अगोदरच राखून ठेवण्यात आलेल्या जागा वगळण्यात येऊन ज्या प्रभागांमध्ये अशा जागा राखून ठेवणे आवश्यक आहेत, त्या सर्व प्रभागांना आळीपाळीने असे जागांचे आरक्षण देण्यात येईल.

(क) अनुसूचित जाती किंवा अनुसूचित जमाती किंवा नागरिकांचा मागासवर्ग यांपैकी कोणत्याही वर्गासाठी केवळ एकच जागा राखीव असेल तर या वर्गांपैकी कोणत्याही वर्गातील स्त्रियांसाठी कोणतीही जागा नेमून देण्यात येणार नाही.

(ड) महानगरपालिकेमध्ये अनुसूचित जाती अनुसूचित जमाती किंवा यथास्थिति, नागरिकांच्या इतर मागासवर्ग यांमधील कोणत्याही प्रवर्गासाठी केवळ दोनच जागा राखून ठेवण्यात आल्या असतील त्या बाबतीत या दोन जागांपैकी एक जागा चिठ्ठी टाकून स्त्रियांसाठी राखून ठेवण्यात येईल.

(ई) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा यथास्थिति, नागरिकांचा मागासवर्ग यांमधील स्त्रियांसाठी योग्य प्रभागांमध्ये एकदा जागा राखून ठेवण्यात आल्या की, स्त्रियांसाठी राखून ठेवावयाच्या उर्वरित जागा, चिठ्ठी टाकून त्याद्वारे वेगवेगळ्या प्रभागांमध्ये राखून ठेवण्यात येतील.

(फ) उपखंड (ई) मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, नंतरच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या वेळी वेगवेगळ्या प्रभागांमध्ये अशा जागा आळीपाळीने नेमून देताना, आधीच्या निवडणुकांमध्ये ज्या प्रभागांमध्ये स्त्रियांसाठी राखीव जागा ठेवण्यात आल्या असतील ते प्रभाग वगळण्यात येऊन, सर्व प्रभागांना आळीपाळीने असे (जागांचे) आरक्षण देण्यात येईल.

(१८८८ चा मुंबई ३. १९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड २.)

**चिठ्ठ्या टाकण्याची कार्यपद्धती.**

४. महापालिका आयुक्त किंवा त्याने प्राधिकृत केलेला अधिकारी, महापालिका आयुक्ताने, चिठ्ठ्या चिठ्ठ्या टाकण्याचे ठिकाण, दिनांक व वेळ नोटिशीत नमूद करून ती नोटीस शहरातील मोठ्या खपाच्या किमान एका स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिद्ध केल्यानंतर आणि त्याच्या कार्यालयातील सूचना फलकावर ती लावल्यानंतर हजर राहणाऱ्या शहरातील नागरिकांच्या समक्ष चिठ्ठ्या टाकील.

**निवडणुकीकरिता शासन स्थानिक प्राधिकरणे, महामंडळ इत्यादींचा अधिकारी व कर्मचारी यांची मागणी करणे.**

५. संबंधित नगरपालिका कायद्यामध्ये किंवा त्यामध्ये अंतर्भूत असलेल्या किंवा त्याखाली केलेल्या निवडणूक नियमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणताही शासकीय विभाग स्थानिक प्राधिकरण, शासनाकडून स्थापन करण्यात आलेले कोणतेही महामंडळ किंवा कंपनी किंवा संस्था यांमधील अधिकारी किंवा कर्मचारी किंवा शासकीय किंवा अनुदानप्राप्त महाविद्यालये व शाळेमधील शिक्षक किंवा शिक्षकेतर कर्मचारी यांची निवडणुकीशी संबंधित परीय कर्तव्यार्थ महानगरपालिका आयुक्ताने किंवा राज्य निवडणूक आयोगाने प्राधिकृत केलेल्या इतर कोणत्याही अधिकाऱ्याने मागणी करणे कायदेशीर असेल. आणि असा अधिकारी आणि कर्मचारी यांची निवडणुकीच्या संबंधात निर्वाचन अधिकारी, केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी, किंवा अन्य कोणत्याही नात्याने नियुक्ती करता येईल.

(१८८८ चा मुंबई ३. १९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड २.)

**संबंधित नगरपालिका कायदा आणि त्यामध्ये अंतर्भूत असलेले किंवा त्याखाली करण्यात आलेले नियम [illegible]**

६. या अधिनियमाद्वारे अन्यथा तरतूद केले असेल त्याव्यतिरिक्त कोणत्याही संबंधित नगरपालिका कायद्यामध्ये व त्यामध्ये अंतर्भूत असलेल्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांमध्ये अंतर्भूत असलेल्या निवडणुकींच्या संबंधातील तरतुदी ह्या या अधिनियमाद्वारे केलेल्या तरतुदींशी त्या जेथवर विसंगत नसतील तेथवर योग्य त्या फेरफारांसह, या अधिनियमात अंतर्भूत असलेल्या किंवा त्याच्याशी संबंधित असलेल्या कोणत्याही बाबींच्या संबंधात लागू होतील.

**अडचण दूर करणे.**

७. या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आल्याप्रमाणे संबंधित नगरपालिकेच्या कायद्यांपैकी कोणत्याही कायद्याच्या किंवा त्यात अंतर्भूत असलेल्या किंवा त्याखाली करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदींशी, तसेच सर्व संबंधित नगरपालिका कायद्यांच्या किंवा त्यात अंतर्भूत असलेल्या किंवा त्याखाली करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना किंवा या अधिनियमापैकी कोणत्याही अधिनियमाची किंवा त्यात अंतर्भूत असलेल्या किंवा त्याखाली करण्यात आलेल्या नियमांची, या अधिनियमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही बाबींच्या संबंधात अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण निर्माण झाल्यास राज्य निवडणूक आयुक्त, प्रसंगानुरूप आदेशाद्वारे अडचण दूर करण्याच्या दृष्टीने आवश्यक वाटेल अशी कोणतीही कार्यवाही करील.

(१८८८ चा मुंबई ३. १९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड २. १९४९ चा मुंबई ५९.)

**"संबंधित नगरपालिका कायदा" या शब्दप्रयोगाची व्याख्या.**

८. या अधिनियमातील "संबंधित नगरपालिका कायदा" याचा अर्थ,—

(अ) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या बाबतीत, मुंबई महानगरपालिका अधिनियम,

(ब) नागपूर शहर महानगरपालिकेच्या बाबतीत, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८.

(क) अन्य कोणत्याही महानगरपालिकेच्या बाबतीत, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ असा आहे.

सन १९९६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २१ याचे निरसन व व्यावृत्ती.

९. (१) महाराष्ट्र महानगरपालिका (तात्पुरत्या तरतुदी) अध्यादेश, १९९६ हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे. १९९६ चा महा. अध्या. २१.

(२) असे निरसन झाले असले तरीही उक्त अध्यादेशान्वये केलेली कोणतीही गोष्ट किंवा कार्यवाही ही या अधिनियमाच्या तरतुदीअन्वये करण्यात आलेली यथास्थिति, गोष्ट किंवा कार्यवाही आहे असे मानण्यात येईल.

# अनुसूची एक

[कलम २ (४)]

## नामनिर्देशनपत्राचा नमुना

### भाग-अ

(·········महानगरपालिकेचा प्रभाग क्रमांक ······ची निवडणूक)

(प्रस्तावक व अनुमोदनकर्ता आणि उमेदवार यांनी भरावयाचे)

आम्ही, याद्वारे, ·············································· महानगरपालिकेच्या प्रभाग क्रमांक ·········································· मधून निवडणुकीकरिता ···································· यांना उमेदवार म्हणून नामनिर्देशित करीत आहोत.

उमेदवाराचे नाव .. .. ..

वडिलांचे/पतीचे नाव .. ..

वय .. .. ..

व्यवसाय/धंदा .. .. ..

उमेदवाराचा संपूर्ण पत्ता .. ..

जाती, जमाती किंवा मागासवर्ग

अशा जातीच्या, जमातीच्या किंवा यथास्थिति मागासवर्गाच्या किंवा महिलांच्या राखीव जागांकरिता जेव्हा निवडणूक असेल तेव्हा (फक्त अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि मागासवर्गीय नागरिक असलेल्या अशा उमेदवाराने भरावयाचे).

महिलांकरिता राखीव असलेल्या जागेकरिता निवडणूक आहे काय ?

मतदारांच्या यादीमध्ये ज्या प्रभागात मतदार म्हणून त्या उमेदवाराचे नाव नोंदवलेले आहे त्या प्रभागाचे नाव आणि/किंवा क्रमांक.

मतदार म्हणून उमेदवाराचे नाव ज्यात नोंदवलेले आहे अशा वर उल्लेखिलेल्या प्रभागाच्या मतदार यादीत असलेला उमेदवाराचा अनुक्रमांक.

प्रस्तावकाचे नाव .. .. ..

प्रभागाच्या मतदार यादीतील प्रस्तावकाचा अनुक्रमांक . .

दिनांक . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . प्रस्तावकाची सही किंवा अंगठ्याचा ठसा.

अनुमोदनकर्त्याचे नाव . . . .

प्रभागाच्या मतदार यादीतील अनुमोदनकर्त्याचा अनुक्रमांक

दिनांक . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . अनुमोदनकर्त्याची सही किंवा अंगठ्याचा ठसा.

मी, याद्वारे, असे जाहीर करतो की,—

(अ) माझ्या वयाची . . . . . . . . . . . . वर्षे पूर्ण झालेली आहेत.

(ब) या नामनिर्देशनाला माझी संमती आहे.

(क) पालिका सदस्य म्हणून निवडून येण्यासाठी माझ्यात कोणतीही अपात्रता निर्माण झालेली नाही.

दिनांक . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . उमेदवाराची सही किंवा अंगठ्याचा ठसा.

*येथे प्रभागाचे नाव असल्यास ते नमूद करावे.

---

## भाग-ब

**(अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा मागासवर्गीय नागरिक असलेल्या उमेदवाराने करावयाचे आणखी एक प्रतिज्ञापत्र.)**

**(उमेदवाराने भरावयाचे)**

मी, याद्वारे, असे जाहीर करतो की, मी, महाराष्ट्र राज्याच्या संबंधात अनुसूचित जात/अनुसूचित जमात/मागासवर्ग असलेल्या . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .
*या अनुसूचित जातीचा/जमातीचा/मागासवर्गाचा नागरिक आहे.

दिनांक . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . उमेदवाराची सही किंवा अंगठ्याचा ठसा.

*लागू नसेल ते खोडावे.

टीपा.—(१) शाळा किंवा महाविद्यालयामध्ये प्रवेश देण्याच्या प्रयोजनासाठी राज्य शासनाने विहित केलेल्या व सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेल्या जाती प्रमाणपत्राची सत्यप्रत सोबत जोडावी लागेल.

(२) नामनिर्देशनपत्राच्या छाननीच्या वेळी पडताळणीसाठी मूळ जाती प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

(निवडणूक चिन्हाच्या निवडीबाबतचे प्रतिज्ञापत्र)

मी, याद्वारे, आणखी असे जाहीर करतो की,—

(अ) मी या निवडणुकीमध्ये, . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . * पक्ष/आघाडी यांच्यातर्फे उभा आहे.

(ब) मी निवडलेली निवडणूक चिन्हे ही पसंतीक्रमानुसार पुढीलप्रमाणे आहेत :—
(१)
(२)
(३)

दिनांक .................... उमेदवाराची स्वाक्षरी किंवा अंगठ्याचा ठसा.

टीप.—(१) उमेदवारास कोणत्याही पक्षाने किंवा आघाडीने पुरस्कृत केले नसल्यास, बाब (अ) खोडून टाकावी.

(२) प्रत्येक उमेदवाराने, मग त्याला कोणत्याही पक्षाने किंवा आघाडीने पुरस्कृत केलेले असो, बाब (ब) मधील तीन चिन्हे निर्दिष्ट करावयाची आहेत.

---

### भाग-क

नामनिर्देशनपत्राचा अनुक्रमांक

हे नामनिर्देशनपत्र, *उमेदवाराने/उमेदवाराच्या प्रस्तावकाने/अनुमोदनकर्त्याने .......... रोजी (दिनांक) ................................ वाजता (वेळ) माझ्याकडे माझ्या कार्यालयात सुपूर्द केले.

दिनांक .................... महापालिका आयुक्त/निर्वाचन अधिकारी यांची सही.

**नामनिर्देशनपत्र स्वीकारणाऱ्या किंवा फेटाळणाऱ्या महापालिका आयुक्ताचे किंवा निर्वाचन अधिकाऱ्याचे प्रतिज्ञापन**

मी, ................................................ अधिनियमाच्या कलम ................................ नुसार हे नामनिर्देशनपत्र तपासले असून पुढील-प्रमाणे निर्णय देत आहे :—

दिनांक .................... महापालिका आयुक्त/निर्वाचन अधिकारी यांची सही.

*लागू नसलेला मजकूर खोडावा.

---

### भाग-ड

**(नामनिर्देशनपत्र व छाननीची नोटीस यांची पावती)**
**(नामनिर्देशनपत्र सादर करणाऱ्या व्यक्तीकडे द्यावयाची)**

नामनिर्देशनपत्राचा अनुक्रमांक

.................... च्या .................... क्रमांकाच्या .......... प्रभागामधील निवडणूक उमेदवार .............................. यांचे नामनिर्देशनपत्र ............................ (दिनांक) रोजी .................... (वेळ) वाजता *उमेदवाराकडून/उमेदवाराच्या प्रस्तावकाकडून/अनुमोदनकर्त्याकडून माझ्याकडे माझ्या कार्यालयात सुपूर्द करण्यात आले.

सर्व नामनिर्देशनपत्रांची ........................................................ (ठिकाण) येथे ........................................................ रोजी (दिनांक) ........................................ वाजता (वेळ) छाननी करण्यात येईल.

दिनांक ........................................

महापालिका आयुक्त/निर्वाचन अधिकारी
यांची सही.

*लागू नसलेला मजकूर खोडावा.

अनुसूची दोन

[कलम २ (५)]

प्रभाग क्रमांक २१, रेल्वे क्वॉर्टर्स, रमाबाई नगर

१९९७--म.न.पा./सा. निवडणूक

मतदार यादी भाग क्रमांक ................................

मतदाराचा अनुक्रमांक ................................

№

मतदाराची स्वाक्षरी
किंवा अंगठ्याचा ठसा.

**पारवाणी विरा अशोक**
**Parwani Vira Ashok**

№

२१, रेल्वे क्वॉर्टर्स, रमाबाई नगर
१९९७--म.न.पा./सा.नि.

**उदासी इंदीरा जमनादास**
**Udasi Indira Jamnadas**

**तलरेजा भारती मनु**
**Talreja Bharti Manu**

**ग्रोवर आशा सुभाष**
**Grover Asha Subhash**